जाहिरात .

# जिल्हा परिषद धुळे
## शिक्षण विभाग (प्राथमिक)
## (केंद्रपुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना )

केंद्रपुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत जिल्हा परिषदे अंतर्गत रिक्त असणारी डेटा एन्ट्री ऑपरेटरची पदे तात्पुरत्या स्वरुपात पुढिल ११ महिन्याचे कालावधी करिता कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर भरण्यात येणार आहेत. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अटी पुर्ण करणा-या उमेदवारांचे अर्ज सोबत दिलेल्या विहित नमुन्यात शिक्षण विभाग (प्राथमिक), जिल्हा परिषद धुळे येथे दि. 20/03/2024 पावेतो सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत समक्ष अथवा पोस्टाने सुट्टीचे दिवस वगळून स्विकारले जातील.

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या व ठिकाण | मासिक एकत्रित परिश्रमिक /मानधन | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | डेटा एंन्ट्री ऑपरेटर | तालुकास्तर - २ (साक्री , शिरपूर)<br>महानगरपालिका शिक्षण मंडळ कार्यालय धुळे - १ पद<br>जिल्हास्तर कार्यालय जिल्हा परीषद धुळे - १ पद<br><br>एकूण ४ पदे | रु. २०६५०/- | 1) किमान १२ वी पास(पदवीधर उमेदवारास प्राधान्य)<br>2) मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.<br>3) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.<br>4) एम.एस.सी.आय टी किंवा केंद्रशासनाची या संदर्भातील तुल्यबळ संगणकाची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. |

1. वयोमर्यादा - दि.०१/०३/२०२४ रोजी वय वर्षे किमान १८ व कमाल ३५.
2. **निवड पध्दती -**

२.१ डाटा एन्ट्री ऑपरेटरर्स पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारास इ.१० वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी आणि इ.१२ वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी यांची सरासरी काढण्यात यावी. तसेच एखादा उमेदवार पदवीधर असल्यास त्याला १० गुण बोनस देण्यात यावेत.

२.२ अनु क्र.२.१ मध्ये विषद केल्याप्रमाणे गुणांकन करुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी. गुणवत्ता यादीतील उमेदवारांना संगणक परिक्षेकरीता एका पदासाठी गुणानुक्रमे १२ उमेदवार याप्रमाणे बोलावण्यात यावे.सदर उमेदवारांची मराठी टायपिंग-३० शब्द प्रति मिनिट व इंग्रजी टायपिंग -४० शब्द प्रति मिनिट आणि संगणक ज्ञानाची प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी. यासाठी सर्व मिळून १०० गुण देण्यात यावे. प्रस्तुत प्रात्यक्षिक परिक्षेमध्ये किमान ५० गुण प्राप्त होणारे उमेदवार "डाटा एन्ट्री ऑपरेटरर्स " च्या पदावरील निवडीसाठी पात्र राहतील.

नोकरी शोधताय? आमच्या वेबसाईटला भेट द्या 👉 Click here

२.३ उपरोक्त नं.२.१ व २.२ मधील गुणांची बेरीज करुन गुणानुक्रमे मजुर पदांएवढी निवडयादी प्रसिध्द केली जाईल. आणि त्यानुसार सदर उमेदवारांना कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात डेटा एंट्री ऑपरेटर म्हणून नियुक्ती देण्यात येईल व तेवढयाच पुढील उमेदवारांची प्रतिक्षायादी प्रसिध्द केली जाईल.

२.४ रिक्त पदांचे सामाजिक आरक्षण :

| जातीचा प्रवर्ग | अजा १०% | अज-२२% | विजाअ ३% /भजब २.५% | भजब २.५% | भजक ३.५% | भजड २% / विमाप्र २ | विमाप्र २ | इमाव १९% | आदुघ १०% | अराखीव ३०% | अराखीव महिला समांतर आरक्षण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रिक्त पदे | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ४ |

**३. सूचना -**

३.१ उमेदवारांनी विहीत नमुन्यात अलिकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज सादर करावा. सदर अर्जांच्या पाकीटावर **"प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना, डेटा एंट्री ऑपरेटर पदाकरिता अर्ज"** असे नमुद करावे.

३.२ अर्जासोबत शैक्षणिक पात्रता,व्यावसायिक पात्रता,वय,अनुभव इत्यादींच्या साक्षांकित केलेल्या प्रती जोडाव्यात

३.३ अर्जासोबत स्वत:चे संपुर्ण नांव व पत्ता असलेला "4 x 6" आकार असलेला रिकामा, रुपये ५/- चे पोष्टाचे तिकीट लावलेला लिफाफा पार्टविण्यात यावा.

३.४ अर्ज करण्याची अंतिम तारीख 20/3/2025 सायंकाळी ५.०० वाजेपावेतो असेल. यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

३.५ नियुक्तीपूर्वी उमेदवाराकडून शासनाकडील विहीत नमुन्यात करारनामा करुन घेण्यात येईल आणि त्याचप्रमाणे कर्मचा-यावर कोणत्याही प्रकारचा गुन्हा किंवा आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करावे लागेल.

३.६ कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या डेटा एंट्री ऑपरेटर या पदासंबंधी सेवाशर्ती, शैक्षणिक अर्हता, एकत्रित टोक मानधन व नियुक्तीची कार्यपध्दती या संदर्भात आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

३.७ कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांचे सेवा करारपत्रात नमुद केलेल्या कालावधीनंतर आपोआप संपुष्टात येईल.

३.८ डेटा एंट्री ऑपरेटर म्हणून नियुक्त केलेल्या कंत्राटी पध्दतीच्या कर्मचा-यांस नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाहीत. तसेच 11 महिन्यांच्या कंत्राटी सेवेच्या आधारावर त्यास शासकिय सेवेमध्ये नियुक्तीसाठी कोणताही हक्क अराणार नाही.

३.९ संबंधित कर्मचा-यांविरुद्ध शासकिय कामकाजाबाबत तक्रार आल्यास व त्यानुसार दोषी आढळल्यास विहित कालावधीपूर्वीच कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल

३.१० सदर कंत्राटी पद भरती जाहिरात www. dhule.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे

सदस्य सचिव
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद नाशिक

अध्यक्ष
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

जॉईन टेलिग्राम ग्रुप CLICK HERE